CNR No. MHSO060005692020 **नियमित दिवाणी दावा क्र. ५७/२०२०**

शामल रणदिवे

वि.

राजाराम भोसले वगैरे

## आदेश निशाणी क्र. ४३ आणि १ वर

०१. प्रतिवादी क्र. २ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे हा अर्ज दिलेला आहे. दावा मिळकत क्र. १(ड) व १(इ) म्हणजे मौजे तुंगत, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. ४६९ व ४७० च्या संपादनाबाबत मिळणा–या मावेजा रकमेमध्ये हक्क व अधिकार आहे अशी जाहीर घोषणा होऊन मागितली आहे. प्रस्तुत संपादनापोटी प्रतिवादी क्र. १ व २ यांना रक्कम रु. ८५,७६,७३०/– इतकी नुकसान भरपाई म्हणून मिळणार आहे. त्यामध्ये वादी यांना त्यांचा १/४ हिस्सा व अधिकार आहे असे नमूद केले आहे. परंतु त्यावर आवश्यक कोर्ट फी वादी यांनी दिलेली नाही. त्यामुळे दावा नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र. १ व २ यांनी केली आहे.

०२. वादी यांनी निशाणी क्र. ५२ प्रमाणे त्यांचे म्हणणे दिले आहे. नुकसान भरपाई रकमेपैकी १/४ रक्कम मिळण्याची मागणी वादी यांनी केलेली आहे. त्यासाठी दावा दुरुस्ती करण्यासाठी निशाणी क्र. ५३ प्रमाणे वादी यांना अर्ज दिलेला आहे. त्याप्रमाणे आवश्यक कोर्ट फी स्टॅम्प भरण्याची तयारी वादी यांनी दाखवली आहे. आज रोजीच निशाणी क्र. ५३ प्रमाणेचा अर्जावर आदेश देऊन प्रस्तावित दुरुस्ती व आवश्यक कोर्ट फी स्टॅम्प देण्यास वादी यांना परवानगी दिलेली आहे. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

आवश्यक कोर्ट फी स्टॅम्प वादी यांनी मुदतीत द्यावा अन्यथा प्रकरणात पुढील योग्य ते आदेश करण्यात येतील.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2022.03.08 13:10:16 +0530

दि. ०७/०३/२०२२ ( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 07/03/2022 |
| Order uploaded on | : | 08/03/2022 |